भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.३२३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ११/०५/२०१७

**१) घराचा ताला तोडुन बेडरूम मधील लोखंडी आलमारीतील सोन्याचे दागीन्याची चोरी. :–**

दिनांक ०९/०५/२०१७ ते १०/०५/२०१७ चे १०.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी पोहवा. केशव खोटेले वय ५४ रा. भैय्याजी नगर खात रोड भंडारा यांनी आपले घराला ताला लावुन लग्न कार्याकरिता गेले असतांना कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन समोरील दाराचा घराचा ताला तोडुन आत प्रवेश करून घरातील बेडरूम मधील लोखंडी आलमारी मध्ये ठेवलेले १ सोन्याची मोरपंखी नथ ३ ग्रॅम, २ सोन्याचे रिंग ५ ग्रॅम, १सोन्याची अंगठी १ ग्रॅम, असा एकुन १८,०००/रू. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. भंडारा येथे कलम ४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. तोडासे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) घराचा ताला तोडुन देवघरातील,बेडरूममधील चांदीच्या व पितळी सामानाची चोरी केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०५/०५/२०१७ चे ०८.००वा. ते १०/०५/२०१७ चे १०.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी प्रशांत चंद्रप्रकाश गुप्ता वय ४३ वर्ष रा. गुरूनानक वार्ड गोंदिया ह.मु. प्रगती कॉलनी भंडारा यांचे सासरे सुभाष सरवनलाल थानथराटे हे दि. ५/०५/२०१७ ला घराला कुलुप लावुन आपले पत्नीसह पुण्याला मुलाकडे गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन त्यांचे घराचे देवघराचे बाजुची खिडकीची सलाख तोडुन आत प्रवेश करून देवघरातील व बेडरूम मधिल चांदीचा लोटा, १ चांदीचा ग्लास, ३ चांदीच्या मुर्त्या, चांदीचा स्टॅड, पितळी देवपाट, २ पितळी मुर्ती असा एकुण ८,२००/रू. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. भंडारा येथे कलम ४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. तोडासे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) बेकायदेशीर रित्या जमाव जमवुन घरात अनाधिकृतपणे प्रवेश करून पैशाचे कारणावरून भांडण करुन काठीने व लाथाबुक्यांनी मारुन दुखापत केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०९/०५/२०१७ चे १०.०० वा. दरम्यान यातील आरोपी क्र. १ ने बेकायदेशीर रित्या जमाव जमवुन ईतर ८ आरोपीसह फिर्यादीचे घरात अनाधीकृतपणे प्रवेश करून आरोपी क्र. १ ने फिर्यादीस माझ्याकडुन १०००/रू. मागुन महिद्र शहारे यास दिलेले पैसे का परत केले नाही. म्हणुन पैशाचे कारणावरून आरोपीतांनी भांडन करून फिर्यादी व त्याचे भावास काठीने व लाथा बुक्यांनी मारहान करून दुखापत केल्याने फिर्यादी अमर मोतीराम लांजेवार वय ३२ वर्ष रा. बोरी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोस्टे. तुमसर येथे कलम १४३,१४७,४५२, भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. माहुर्ले पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

४) दारू पिऊन दारूचे नशेत वाहन चालवितांना लायसन्स न बाळगता मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक १०/०५/२०१७ चे १७.०० ते १७.३० वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन दारू पिऊन दारूचे नशेत व तसेच व ड्रायव्हींग लायसन्स नसतांनी वाहन चालवितांनी मिळुन आल्याने वैधकीय अहवाला वरून सरतर्फे फिर्यादी पोना. रामटेके यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे. पवनी येथे कलम १८५ (३)/१८१ मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रामटेके पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

५) अवैध दारु अडयावर धाडी . :–

दिनांक १०/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे. मोहाडी,तुमसर,साकोली, पवनी, येथे अवैध दारु अडयावर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन २४ लिटर हातभट्टी दारु २,४००/रू. ४३ लीटर २०० मिली लिटर देशी दारू किंमती १२,४८०/रु. जुगारातुन १,५५,८७० /रू. असा एकुण किंमती १,७०,७५०/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक १०/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०३, तीन सिटर वाहनांवरती १४ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ९२ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(एस. व्हीं. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र ९९८७३८५४०५

PSI

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.